महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ No - 8607 दिनांक: 10 AUG 2023

## सूचना

**विषय :-** जाहिरात क्र.०१/२०२३ अन्वये दि.१९.०६.२०२३ ते दि.२२.०६.२०२३ रोजी पर्यंत पार पडलेल्या शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणी अंती कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०१/२०२३
२) महानिर्मिती सूचना क्र.१५२३ दि.१४.०२.२०२३
३) महानिर्मिती सूचना क्र.३२०२ दि.०६.०४.२०२३
४) महानिर्मिती सूचना क्र.५१६८ दि.०५.०६.२०२३

महानिर्मिती कंपनीतर्फे "कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)" यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने दि.१५.०४.२०२३ रोजी "कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)" या पदाची ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. तदनंतर ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने १:२० या प्रमाणात पात्र उमेदवारांची शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणी दि.१९.०६.२०२३ ते दि.२२.०६.२०२३ रोजी पार पाडण्यात आली आहे.

उपरोक्त ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्राप्त गुणांच्या आधारे कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे. तसेच महानिर्मिती कंपनीतर्गंत पहारेकरी (Watchman) म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या पदांसमोर अर्ज सादर केलेल्या आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीअंती पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेस, पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी ↵ क्लिक करावे.

**"कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) पदाची यादी"** ↵

**"कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)-महानिर्मिती कंपनीतील पहारेकरी यांच्यासाठी राखीव पदाची यादी"** ↵

* वरील यादीत उमेदवारांच्या नावाचा अनुक्रम हा त्यांना ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

उमेदवारांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त यादी ही ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणानुक्रमे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेवून तयार करण्यात आलेली आहे. शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणी करीता उपस्थित सर्व उमेदवारांचे शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत प्राप्त गुण अंतिम निवड यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील.

कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, कागदपत्रे जमा करणेकरीता खालील अटी व शर्तीची पुर्तता करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी असेल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१) वरील यादीतील सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय,जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, माजी सैनिक, खेळामधील प्राविण्य, प्रकल्पग्रस्त, अनाथ व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्रे ही कागदपत्रे जमा करतेवळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पडताळणी / छाननी न करता बोलविण्यात आले होते. त्यानुसार आता, उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता,वय,जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, माजी सैनिकमहिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, प्रकल्पग्रस्त वा अनाथ व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

३) महानिर्मिती अधिसूचना क्र.११३१३ दि.०५.१२.२०२२ अन्वये उमेदवारांना सूचित केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर करणे बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) ज्या महिला उमेदवारांची कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता निवड ही महिला आरक्षणातर्गंत झाली आहे अशा महिला उमेदवारांनी शासन निर्णय दि.०४.०५.२०२३ च्या अनुषंगाने तसेच शासनाने वेळोवेळी पारीत केलेले निर्णयानुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

५) ज्या उमेदवारांनी इमाव, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड व विमाप्र या प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१७.०२.२०२३) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१८.०८.२०२३ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

६) तसेच ज्या उमेदवारांनी अदुघ या प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले मिळकत प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१७.०२.२०२३) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१८.०८.२०२३ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

७) संबंधीत पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

८) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१७.०२.२०२३) प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

९) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १८.०८.२०१६,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/ क्रीयुसे-२ दिनांक ३०.०६.२०२२ व तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये संबंधीत पदांच्या निवडीकरीता वैध असल्याबाबत संबंधीत सक्षम अधिकारी यांचा वैधता अहवाल सादर करणे आवश्यक असेल.

१०) तसेच अदुघ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन निर्णय दि.१२.०२.२०१९ तसेच त्यानंतर वेळोवेळी शासनाने पारीत केलेले शासन निर्णय / परिपत्रकांच्या अनुषंगाने मिळकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरील उमेदवारांनी शासन निर्णयात नमूद मिळकतीच्या प्रमाणपत्रात चुकीची / दिशाभूल करणारी माहिती सादर करुन मिळकत प्रमाणपत्र प्राप्त केल्यास, अशा उमेदवारांना भरतीतील कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल व सदरील उमेदवारांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

११) "कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)" या पदाची भरती प्रक्रिया ही मा. उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपुर येथे दाखल रिट याचिका क्र.४२४७ /२०२३ तसेच इतर न्यायालयात दाखल याचिकेंच्या अधिन आहे, याबाबत उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१२) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१३) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१४) कागदपत्रे जमा करण्याच्या पात्रता यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१५) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७) कागदपत्रे जमा करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेल्या अर्जाची मुळ प्रत, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता खाली नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. विहीत नमूद दिनांक व वेळेवर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१८) उपरोक्त यादी ही, कोणतीही निवड अथवा प्रतिक्षा यादी नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

१९) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाकरीता दि.१८.०८.२०२३ रोजी कागदपत्रे पडताळणीकरीता, ती जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी, उमेदवारांना उपस्थित राहावयाचे स्थळ तसेच वेळ खालीलप्रमाणे :-

| दिनांक | वेळ | उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १८.०८.२०२३ | सकाळी ०९.३० | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१ |

10/8/23

**(डॉ.धनंजय सावळकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**

C:\Users\00013471\Downloads\Notification- JSO (3).doc